**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केली छत्तीसगडच्या जगदलपूर इथं २६ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी

- रशियाच्या लष्करी कारवाईचा निषेध करत युरोपियन संघ आणि सदस्यीय देश युक्रेनच्या पाठीशी एकजुटीने उभे असल्याचं युरोपियन महासंघाची माहिती

- महाराष्ट्रातल्या नांदेड येथील डॉ शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात मागील ४८ तासात ३१ मृत्यू

- राज्यात आतापर्यंत सरासरीच्या एकूण ९१ पूर्णांक ६० दशांश टक्के पावसाची नोंद

**आणि**

- हँगझोऊ इथल्या आशियाई स्पर्धेत भारताची विजयी घोडदौड कायम / आतापर्यंत 13 सुवर्ण, 24 रौप्य आणि 24 कांस्य अशा एकूण ६१ पदकांची कमाई

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज छत्तीसगडमध्ये विविध विकास कामांची पायाभरणी आणि लोकार्पण केलं. आदिवासी बस्तर विभागाचं विभागीय मुख्यालय असलेल्या जगदलपूर इथं त्यांनी 26 हजार कोटी

रुपयांहून अधिक किमतीच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी केली. तसंच बस्तरमध्ये नागरनार इथल्या एनएमडीसीच्या ग्रीनफिल्ड पोलाद प्रकल्पाचं त्यांनी लोकार्पण केलं. जवळजवळ २४ हजार कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पामध्ये उच्च गुणवत्तेचं पोलाद उत्पादन होईल. या प्रकल्पामुळे हजारो जणांना रोजगार मिळेल.

आपल्या जगदलपूर भेटीत प्रधानमंत्र्यांनी जगदलपूर रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकास प्रकल्पाची पायाभरणी केली तसंच अंतागड आणि तारोकी दरम्यानचा नवीन रेल्वे मार्ग आणि जगदलपूर आणि दंतेवाडा दरम्यानच्या दुहेरी रेल्वे मार्ग प्रकल्पाचं लोकार्पण केलं. तारोकी आणि रायपूर दरम्यानच्या रेल्वे सेवेलाही प्रधानमंत्र्यांनी हिरवी झेंडी दाखवली. या प्रकल्पांमुळे या आदिवासी भागातला रेल्वे संपर्क सुधारेल आणि या भागाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 45 वर कुंकुरी आणि छत्तीसगड-झारखंड सीमेदरम्यान बांधलेल्या नवीन मार्गाचं देखील प्रधानमंत्री मोदी यांनी आज लोकार्पण केलं.

**<><><><><>**

उत्तर अमेरिकेत मेरीलँड इथं येत्या १४ ऑक्टोबर रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वात उंच पुतळ्याचं अनावरण होणार आहे. स्टॅच्यू ऑफ इक्वॅलिटी नावाचा हा 19 फूट उंचीचा पुतळा ख्यातनाम शिल्पकार राम सुतार यांनी बनवला आहे. गुजरातमध्ये अहमदाबाद इथला सरदार पटेल यांचा पुतळाही त्यांनीच साकारला आहे. अमेरिकेत

मेरीलँडमध्ये अकोकीक शहरात 13 एकर जागेवर भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात आला आहे.

**<><><><><>**

युरोपियन संघ आणि त्याचे सदस्य देश युक्रेनच्या पाठीशी एकजुटीने उभे असून रशियाच्या लष्करी कारवाईचा निषेध करत असल्याचं युरोपियन महासंघानं म्हटलं आहे. युरोपियन महासंघाचे सर्व प्रमुख प्रतिनिधींची बैठक युक्रेनची राजधानी कीव इथं झाली. या बैठकीत युक्रेनला मदत देण्याच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्यात आला. युक्रेनला पाठिंबा देण्यासाठी युरोपियन महासंघाचे सर्व सदस्य एकजूट असल्याचं युरोपियन महासंघाचे परराष्ट्र धोरण प्रमुख जोसेफ बोरेल यांनी वार्ताहर परिषदेत सांगितलं.

**<><><><><>**

तेलंगणामध्ये आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये जन सेना ११९ पैकी ३२ जागा लढवणार आहे. जन सेना ग्रेटर हैदराबाद नगरपालिका आणि खम्मम आणि नलगोंडा जिल्ह्यांमधल्या बहुतांश जागांवर उमेदवार उभे करणार आहे. हैदराबादमध्ये काल संध्याकाळी जन सेना पक्षाने ही घोषणा केली. बहुतांश जागांवर जन सेना पक्ष निर्णायक स्थितीत असल्याची महिती पक्षाचे उपाध्यक्ष बी महेंद्र रेड्डी यांनी बातमीदारांशी बोलताना दिली.

**<><><><><>**

नांदेड येथील डॉ शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात मागील 24 तासात 24 मृत्यू तर आज सात जणांचा मृत्यू झाला. जिल्हा रुग्णालय

प्रशासनाने म्हटलं आहे की,अत्यवस्थ रुग्ण वैद्यकीय तज्ञांच्या निगराणी खाली असून सर्व वैद्यकीय सेवा पुरविण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासन करत आहे. जिल्हा नियोजन माध्यमातून या आर्थिक वर्षासाठी 12 कोटी रुपये निधी देण्यात आला असून अजून 4 कोटी रुपये मंजूर झाला असल्याचा हि त्यांनी सांगितलं नांदेड जिल्हा आणि महाराष्ट्राच्या इतर भागातून अत्यावस्थ रुग्णांची संख्या एकदम वाढल्याने हे मृत्यू झाल्याचे डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपूरीचे वैद्यकीय अधिक्षकांनी सांगितलं. माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांनी रुग्णालयाला भेट देऊन काल पाहणी केली. रुग्णांशी आणि रुग्णालय प्रशासनाशीही त्यांनी संवाद साधला. ते पुढे म्हणाले की, अद्याप 70 रुग्ण गंभीर अवस्थेत असून त्यांच्यावर तातडीने उपचार व्हायला पाहिजे. तसचं हे रुग्णालय 500 बेड चं असून सद्यस्थितीत इथं 1200 च्या जवळपास रुग्ण उपचार घेत आहेत. अपुरे कर्मचारी आणि वैद्यकीय तज्ञ असून याबद्दल शासनाने गंभीरपणे लक्ष देण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. या पार्श्वभूमीवर आज आरोग्य मंत्री हसन मुश्रीफ हे रुग्णालयाला भेट देऊन पाहणी करणार आहेत.

**होल्ड….बाईट - अशोकराव चव्हाण…..माजी मुख्यमंत्री**

**<><><><><><>**

छत्रपती संभाजीनगर शहरातल्या घाटी रुग्णालयामध्ये कालपासून २४ तासांत दोन नवजात बालकांसह १० जणांचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणी

विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात १ जूनपासून आतापयंत सरासरी पाऊस सुमारे १ हजार ११ मिलिमीटर झाला आहे. राज्यात आतापर्यंत सरासरीच्या एकूण ९१ पूर्णांक ६० दशांश टक्के पावसाची नोंद झाली आहे. जूनमध्ये सरासरीच्या ५३ पूर्णांक ७ दशांश टक्के तर जुलैमध्ये सरासरीच्या १३८ पूर्णांक ७ दशांश टक्के पाऊस पडला आहे. ऑगस्टमध्ये सरासरीच्या ३८ टक्के पाऊस झाला असून सप्टेंबरमध्ये सरासरीच्या १२८ पूर्णांक ८० दशांश टक्के पाऊस पडला आहे. तर ऑक्टोबर महिन्यात आतापर्यंत सरासरी ७१ पूर्णांक १० दशांश मिलीमीटर पाऊस झाला आहे.

**<><><><><>**

हॅंगझोऊ इथल्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या दहाव्या दिवशी भारतानं आणखी एक कांस्य पदक जिंकून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. भारतानं आतापर्यंत 13 सुवर्ण, 24 रौप्य आणि 24 कांस्य अशा एकूण ६१ पदकांची कमाई केली असून, सध्या पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे.

अर्जुन सिंग आणि सुनील सिंग सलाम या जोडीनं पुरुष कॅनो दुहेरी 1000 मीटर स्पर्धेत कांस्यपदक जिंकलं. पुरुष क्रिकेट सामन्यात भारतानं नेपाळविरुद्ध 23 धावांनी विजय मिळवत उपांत्य फेरीत आपलं स्थान निश्चित

केलं. तिरंदाजी स्पर्धेत ज्योती सुरेखा वेन्नम हिनं आदिती गोपीचंदला पराभूत करत स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अभिषेक वर्मानं पुरुषांच्या वैयक्तिक कंपाऊंड स्पर्धेच्या अंतिम फेरीत कोरियावर दिमाखदार विजय मिळवत स्पर्धेत आपलं स्थान निश्चित केलं. महिला हॉकीमध्ये, भारतीय संघानं अखेरच्या लीग सामन्यात हाँगकाँगचा 13-0 नं पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. टेनिसमध्ये महिला संघानं मंगोलियाचा ३-० असा पराभव करून विजय नोंदवला. भारतीय मिश्र दुहेरी स्क्वॉश जोडी दीपिका पल्लीकल आणि हरिंदर पाल सिंग संधू यांनी पूल ए सामन्यात जपानविरुद्ध विजय मिळवला. पुरुषांच्या 4 x 400 मीटर रिले स्पर्धेच्या पहिल्या फेरीत भारतानं पाहिलं स्थान पटकावलं असून, पुरुष रिले संघानं स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. कबड्डी मध्ये भारतानं आपल्या गट टप्प्यातल्या पहिल्या सामन्यात बांगलादेशचा ५५-१८ असा सहज पराभव केला. बॅडमिंटनमध्ये,भारताच्या एचएस प्रणॉयनं पुरुष एकेरीच्या ३२व्या मंगोलियाच्या फेरीत मुंखबातविरुद्धच्या सामन्यात विजय मिळवला, तर पीव्ही सिंधूनं महिला एकेरीच्या ३२व्या फेरीत वेन ची सू हिचा पराभव केला.

आशियाई स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी केलेल्या दिमाखदार कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

//<><><><><><>//